सकाळ

# भरपावसात उभा राहतोय ‘केबल स्टे ब्रिज’

## देशातील सर्वात उंच पूल; मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वेवरील मिसिंग लिंकचे काम युद्धपातळीवर

बापू सुळे : सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. २९ : मुंबई-पुणे मिसिंग लिंकचा भाग असलेला देशातील सर्वात उंच ‘केबल स्टे ब्रिज’चे काम भरपावसात सुरू आहे. धुवाधार पाऊस आणि खोल दरीतून ताशी १८० किलोमीटर वेगाने वारे वाहत असतानाही अखंडपणे या महाकाय ब्रिजचे काम सुरू आहे. तब्बल १०० वर्षे आयुष्यमान असलेल्या हा ब्रिज अफकॉन इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी उभारत आहे. मार्च अखेरपर्यंत येथील बोगदे आणि खोल दरीवरील ‘केबल स्टे ब्रिज’चे काम पूर्ण होणार आहे. त्यामुळे वाहनधारकांचा जवळपास २० ते २५ मिनिटांचा वेळ वाचणार आहे.

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील कोंडी फोडण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून खोपोली ते कुसगावदरम्यान १३.५ किलोमीटर लांबीचा मिसिंग लिंक उभारला जात आहे. दोन बोगदे आणि खोल दरीवर दोन केबल वायडक्ट ब्रिज उभारण्याचे काम सुरू आहे. त्यापैकी महाकाय ८५० मीटर लांब आणि १८२ मीटर उंचीच्या वायडक्ट ब्रिजचे काम पूर्ण झाले असून ६५० मीटर लांब ‘केबल स्टे वायडक्ट’चे काम सुरू आहे. तसेच, बोगद्याचे काम झाले असून त्यामधील इतर पूरक कामे सुरू आहेत. एकूण प्रकल्पाचा विचार करता मार्च २०२५ पर्यंत काम पूर्ण करण्यात येणार आहे.




- अफकॉन इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीकडून उभारणी
- घाट परिसरातील एक्स्प्रेस-वेवरील वाहतूक कोंडी सुटणार
- १०० किमी वेगाने वाहने चालवणे शक्य
- मार्च अखेरपर्यंत काम पूर्ण होणार




### पाच रिश्टर स्केलचा भूकंप पचवणार

पाच रिश्टर स्केलचा भूकंप पचवू शकेल, अशी या पुलाची रचना केली आहे. तसेच, पायलॉन म्हणजे उभ्या पिलरमध्ये ३२ एमएमचे लोखंडी रॉड वापरले आहेत. तसेच, वायडक्टसाठी ३.५ लाख क्यूबिक मीटर सिमेंट कॉंक्रीट, ३१ हजार टन लोखंडाचा वापर केला आहे.

### यासाठी मिसिंग लिंकची गरज

१ मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे आणि मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग चार खालापूर टोल प्लाझाजवळ एकत्र येतात. तर, खंडाळा एक्झिटजवळ वेगवेगळे होतात.

२ मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेच्या सहा मार्गिका आणि महामार्ग चारवरील चार मार्गिकांची वाहतूक एकत्र येत असल्याने घाट परिसरात एक्स्प्रेस वेवर मोठी वाहतूक कोंडी होते.

३ त्यावर उपाय म्हणून एमएसआरडीसीकडून मिसिंग लिंकचा पर्याय पुढे आणला आहे. या प्रकल्पावर ‘अफकॉन’चे जवळपास एक हजारहून अधिक अभियंते, तांत्रिक कर्मचारी, मजूर कार्यरत आहेत.



### दोन टप्प्यांत काम

- खोपोली ते कुसगाव हे सध्या १९ किलोमीटरचे अंतर असून मिसिंग लिंकमुळे लोणावळा बायपास होणार आहे. त्यामुळे सध्या घाटात एक्स्प्रेस वेवर होत असलेली वाहतूक कोंडी फुटणार आहे. या प्रकल्पाचे काम दोन टप्प्यांत सुरू आहे.
- पहिल्या पॅकेजमध्ये ८.९२ किमी आणि १.७५ किमी लांबीच्या बोगद्याचे काम नवयुग कन्स्ट्रक्शन कंपनी करत असून त्याचा खर्च अडीच हजार कोटी रुपयांच्या घरात आहे.
- दुसऱ्या पॅकेजमध्ये महामार्गाच्या साडेसहा किलोमीटरचे रुंदीकरण आणि ८५० मीटर आणि ६५० मीटरचे दोन वायडक्ट असून त्याचा खर्च एक हजार ३२२ कोटी रुपये आहे.

- **१३.५ किमी** मिसिंग लिंकची लांबी
- **१०० वर्षे** पूलाचे आयुष्यमान
- **२० ते २५** मिनिटे वेळ वाचणार

एक हजारहून अधिक अभियंते, तांत्रिक कर्मचारी, मजूर कार्यरत

दोन बोगदे आणि खोल दरीवर दोन केबल वायडक्ट ब्रिज उभारण्याचे काम सुरू आहे.

**८५० मीटर लांब आणि १८२ मीटर उंचीच्या वायडक्ट ब्रिजचे काम पूर्ण ६५० मीटर लांब ‘केबल स्टे वायडक्ट’चे काम सुरू.**

बोगद्याचे काम झाले असून त्यामधील इतर पूरक कामे सुरू आहेत.

### ताशी २७० किमी वाऱ्याशी सामना

लोणावळा परिसरात पावसाळ्यात सुमारे तशी १८० किलोमीटर वेगाने वारे वाहतात; मात्र चक्रीवादळ आल्यास ‘केबल स्टे ब्रिज’ला धोका निर्माण होऊ नये, यासाठी ताशी २७० किलोमीटर वेगाच्या वाऱ्यासमोरही दिमाखात उभा राहील, अशी पुलाची रचना केली जात आहे. त्यासाठी डेन्मार्कमध्ये विंड ब्रिज चाचणी केली आहे.

### २८ मीटर खोल पाया

सहाशे मीटर लांबीचा वायडक्ट असलेल्या दरीत ताशी १८० किलोमीटर वेगाने वारे वाहतात. त्यामुळे १८२ मीटर उंचीचा आणि २६ मीटर रुंदी असलेला हा ‘केबल स्टे ब्रिज’ उभारला जात असून त्याचा पाया तब्बल २८ मीटर खोलीपर्यंत आहे. त्यामुळे या ब्रिजला मजबुती येणार असल्याचे प्रकल्प संचालक रंजन कुमार मिश्रा यांनी सांगितले. या मजबुतीमुळे मिसिंग लिंकवर ताशी १०० किलोमीटर वेगाने वाहने चालवणे शक्य होणार आहे.



Mumbai, Mumbai-Today
30/09/2024 Page No. 1